राज्यातील बंद पडलेल्या गिरण्या/कंपन्या/कारखाने यांच्या
जमिनीच्या विकासासाठी तसेच महाराष्ट्र औद्योगिक
विकास महामंडळामार्फत उद्योगांचे हस्तांतरण करताना
कामगारांची देणी प्रलंबित नसल्याबाबतचे कामगार
आयुक्त यांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : नाहप्र-**१२२००९**/प्र.क्र. ३३५/कामगार-२
मंत्रालय विस्तार, मुंबई- ३२.
दिनांक : २ जानेवारी, २०१०

# परिपत्रक

राज्यातील बंद पडलेल्या गिरण्या/कंपन्या/कारखाने यांच्या जमिनीची विक्री/विकासासाठी तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत उद्योगांचे हस्तांतरण/विक्री करताना कामगारांची देणी प्रलंबित नसल्याबाबत ना हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करण्याच्यावेळी व्यवस्थापनाने/मालकांने सोबत जोडलेल्या स्वतंत्र यादी (Check List) प्रमाणे सर्व कागदपत्रे जोडणे/सादर करणे अनिवार्य राहील. याबाबतीत कृपया नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( **कविता गुप्ता** )
सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग

प्रत-
मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,
कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व अपर /उप / सहायक कामगार आयुक्त
कक्ष अधिकारी (प्रशासन-२) उद्योग.ऊर्जा व कामगार विभाग यांना सदर शासन निर्णय वेबसाईटवर टाकण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
निवडनस्ती.

## कामगारांची कायदेशिर देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेबाबतचा विहीत नमुन्यातील अर्ज

अर्ज सादर केल्याचा दिनांक :-

प्रति,

-------------------------

-------------------------

-------------------------

-------------------------

विषय:- राज्यातील बंद आस्थापना/कंपन्या/कारखाने/गिरण्या यांच्या जमीनीच्या विकासासाठी/विक्रीसाठी/हस्तांतरणासाठी कामगार आयुक्त यांच्याकडून कामगारांची कायदेशिर देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बाबत.

अर्जदाराचे नांव व पत्ता :- -------------------------

-------------------------

-------------------------

-------------------------

महोदय,

मी श्री.------------------------------ रहाणार पत्ता----------------------------------------------------------------------------------------------------------------------

(जमीनीचा विक्रेता/खरेदीदार/विकासक) आपणास विनंती करतो की, खालील निम्नलिखीत केलेल्या जमीनीचा/ची मी विक्री/खरेदी/विकास करु इच्छितो. या संदर्भात कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडून मला कामगारांची देणी थकित नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करण्याची आवश्यकता आहे. वरील जमीनी बाबत/त्यावरील कारखान्याबाबत/कारखान्यातील कामगारांबाबतचा तपशिल मी पुढील प्रमाणे सादर करीत आहे.

| अनु. क्र. | माहितीचा तपशिल | |
|---|---|---|
| १. | गिरणी/कारखाना/आस्थापना यांचे नांव व पुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक | |
| २. | उपरोक्त कारखान्याच्या नोंदणीकृत कारखान्याचा पत्ता व दुरध्वनी क्रमांक | |
| ३. | अध्यक्ष/संचालक/मालक/भागीदार/नियोक्ता यांचे नांव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक, मोबाईल नंबर | |

| | | |
|---|---|---|
| ४. | जमीनीचे क्षेत्रफळ | |
| ५. | **महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ/स्थानिक स्वराज्य संस्था/महसुल विभाग यांच्याकडून जागा/भुखंड विक्रीने अथवा भाडेतत्वांवर घेतल्याबाबतचे कब्जा पावती/मालमत्ता पत्रक तसेच उभयपक्षांत झालेल्या जागेच्या भाडेकरार/विक्री संबंधी भाडेकराराच्या संबंधीची छायांकित प्रती अर्जा सोबत दोन प्रतीत जोडणे आवश्यक आहे त्या जोडल्या आहेत किंवा कसे ?** | |
| ६. | आस्थापनेच्या/कंपनीच्या मुळ मालकाने/भागीदाराने/संचालकाने जागा विकण्याबाबत/जागेचा विकास करण्याबाबत करार/ठराव केला आहे किंवा कसे ? असल्यास त्याबाबतच्या कराराची/ठरावाची छायाकिंत व साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच कंपनी/आस्थापना ही पब्लीक लिमिटेड/लिमिटेड/प्रायव्हेट लिमिटेड असल्यास जागा विकणे बाबत/विकास करण्याबाबतचा संचालक मंडळाचा ठराव केला आहे किंवा कसे ? तसा ठराव करणे आवश्यक आहे व केलेल्या ठरावाची छायाकिंत व साक्षांकित प्रत अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. | |
| ७. | अर्जदारास जागेच्या मालकाने/भागीदारांनी तसेच संचालक मंडळाने प्रस्तुतचा अर्ज करण्याबाबत प्राधिकृत केलेले आहे किंवा कसे ? असल्यास त्याबाबतच्या ठरावाचे/संचालक मंडळाच्या ठरावाची छायाकिंत व साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. | |
| ८. | जमीनीचे हस्तांतरण करावयाचे आहे की, विकास करावयाचा आहे. | |
| ९. | विषयाकिंत जागेची विक्री/हस्तांतरण/खरेदी करण्याबाबत संबंधित पक्षकाराने केलेल्या व्यवहाराची नोंदणी जिल्हा उपनिबंधक कार्यालयात करणे आवश्यक आहे. तो केला आहे किंवा कसे ? त्याबाबतच्या कागदपत्रांच्या छायाकिंत व साक्षांकित प्रती सादर कराव्यात. | |
| १०. | कारखाना बंद झाल्याची तारीख | |
| ११. | कारखाना बंद झाल्याची कारणे | |
| १२. | कारखाना बंद होतांना कार्यरत असणा-या कामगार/ कर्मचा-यांची संख्या | |

| | | |
|---|---|---|
| | **१. कायम कामगार**<br>**२. कार्यालयीन कर्मचारी**<br>**३. तात्पुरते कामगार**<br>**४. कंत्राटी कामगार**<br>**५. प्रशिक्षणार्थी कामगार**<br>**६. एकुण कामगार**<br>**:- स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.** | |
| १३. | आस्थापना बंद पडण्या पुर्वीच्या मागील १२ महिन्यात हजेरीपटावर असलेल्या कामगार/कर्मचा-यांची सरासरी संख्या | |
| १४. | कामगार संघटनेचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | |
| १५. | कामगार संघटना, मान्यता प्राप्त संघटना/प्रातिनिधीक संघटना आहे काय | |
| १६. | औद्योगीक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २५ (ओ) नुसार शासनसाची पुर्व परवानगी घेतली काय ? असल्यास पुर्व परवानगीचे पत्र जोडावे/नसल्यास कारणे नमुद करावीत. | |
| १७. | उद्योग बंद करण्या पुर्वी औद्योगीक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २५ एफ एफ नुसार ६० दिवसांची पुर्व सुचना शासनास देण्यात आली काय ? असल्यास सुचनेची प्रत जोडावी नसल्यास कारणे नमुद करावीत. | |
| १८. | कारखाना बंद झालेल्या परिणामीत होणा-या कामगारांच्या संदर्भात कामगार संघटनेशी करार करण्यात आला होता काय ? असल्यास कराराची प्रत जोडावी. | |
| १९. | स्वेच्छानिवृत्ती सर्व कामगारांनी स्विकारली काय ? असल्यास कामगारांची स्वेच्छानिवृत्तीची पत्रे सादर करावीत. | |
| २०. | कंपनीचे भौगोलीक स्थलांतर झालेले असल्यास कंपनी जेथे स्थलांतरीत झाली त्या जागेचा पत्ता | |
| २१. | कंपनीच्या स्थलांतराच्या संदर्भात कंपनी स्थलांतरीत होतांना कामावर असलेल्या कामगारांचे मस्टर रोल व स्थलांतरीत जागी असलेल्या कामगारांचे मस्टर रोल यांच्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत काय ? | |
| २२. | जुन्या जागेतील सर्व कामगारांना नवीन स्थलांतरीत जागी नोकरीच्या सलगतेसह व सेवाशर्तीत प्रतिकुल बदल न करता स्थलांतरीत करण्यात आले आहे काय | |

| | | |
|---|---|---|
| २३. | व्यवस्थापनात बदल झालेला असल्यास व्यवस्थापनातील बदलामुळे कामगारांच्या सेवेतील अखंडता आणि सेवाशर्ती कायम ठेवण्यात आल्या आहेत काय | |
| २४ | कंपनीचेस्थलांतर / व्यवस्थापनातील बदल / स्वेच्छानिवृत्ती या बाबत कामगार संघटनेशी करार झालेला आहे काय असल्यास कराराची प्रत जोडण्यात आली काय | |
| २५. | जमीनीच्या विक्री/खरेदी/विकास/स्थलांतर व्यवस्थापनातील बदल यामुळे किती कामगार परिणामीत झाले त्याची संख्या | |
| २६. | जमीनीच्या विक्री/खरेदी/विकास/स्थलांतर व्यवस्थापनातील बदल यामुळे किती कामगारांच्या नोक-या संपुष्टात आल्या. | |
| २७ | किती कामगारांना कायदेशिर रक्कम/स्वेच्छानिवृत्तीची रक्कम वाटप करण्यात आली व एकुण रक्कम किती | |
| २८. | नोकरी गमावलेल्या किती कामगारांची किती आर्थिक रक्कम वाटप करण्याचे शिल्लक राहीलेले आहे. | |
| २९. | वाटप करण्याचे शिल्लक असलेल्या कायदेशिर रक्कमेबाबत व्यवस्थापनाने कोणती तरतूद केलेली आहे. | |
| ३०. | विकसित/विक्री करावयाच्या जमीनीचे क्षेत्रफळ | |
| ३१. | मालकाने जमीन विक्री / विकास यासाठी शासन /महानगरपालिका/नगर पालिकेकडे परवानगीसाठी अर्ज केला असल्यास त्याची तारीख व तपशिल परवानगी मिळाली असल्यास तारीख व तपशिल | |
| ३२. | विकासकाचे/खरेदीदाराचे नांव व पत्ता | |
| ३३. | मुळ मालकापासून जमीन विकत घेतली आहे काय | |
| ३४ | कामगारांना देय असलेल्या रक्कमे बाबत मुळ मालकाशी काही करार झाला आहे काय व असल्यास त्या कराराच्या अटी (कराराची प्रत) | |
| ३५. | विकासकाने/खरेदीदाराने जी जमीन विकसीत करावयाची आहे ती जमीन कोर्ट रिसीव्हर/लिक्वीडेटर / वित्तीय संस्थेकडून जाहीर लिलावात घेतली आहे काय | |
| ३६. | बी.आय.एफ.आर.कडे संदर्भ केला असल्यास त्याचा दिनांक | |
| ३७ | आस्थापना आजारी घोषित केली असल्यास दिनांक | |
| ३८. | ऑपरेटींग एजन्सीचे नांव | |

| | | |
|---|---|---|
| ३९. | पुनरुज्जीवन योजना सादर केली आहे काय, असल्यास तपशिल | |
| ४० | पुनरुज्जीवन योजना मंजूर झाली असल्यास कामगारांची देणी देण्याबाबत योजनेतील तरतूदी व कामगारांना दिलेली देय रक्कम व कामगारांची संख्या | |
| ४१. | बी.आय.एफ.आर.आदेशानुसार कारभार गुंडाळण्याचे आदेश दिले असल्याचा त्याचा दिनांक व उच्च न्यायालया समोरील या बाबत सद्य:स्थिती ए.आय.एफ.आर.कडे अपिल दाखल केले असल्यास त्याचा तपशिल. | |
| ४२ | कारभार गुंडाळण्याचे आदेश दिले असल्यास कोर्ट रिसिव्हर/लिक्वीडेटरची नेमणुक झाली आहे काय ? | |
| ४३ | लिक्वीडेटर/कोर्ट रिसीव्हर / वित्तीय संस्था यांनी मालमत्ता ताब्यात घेतली आहे काय ? कोर्ट रिसीव्हर/लिक्वीडेटर / वित्तीय संस्था यांनी मालमत्तेचा लिलाव केला आहे काय ? लिलावापूर्वी कामगारांच्या प्रलंबित असलेल्या देणीबाबतची माहिती प्रसिध्द करण्यात आली होती काय आणि त्यानुसार कामगारांनी त्यांच्या देण्यापोटी वसूल करावयाच्या रक्कमेचा दावा कोर्ट रिसीव्हर/लिक्वीडेटरकडे दाखल केला आहे काय व असल्यास दाव्यातील एकुण रक्कम | |
| ४४ | कामगार/कामगार संघटना यांनी कारखाना बंद केल्या विरुध्द् औद्योगीक न्यायालय/उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालयासमोर कामगारांची देणी मिळणे/कामकाज पुर्ववत सुरु करणे या बाबत तसेच कामगारांनी वैयक्तिक केलेले संदर्भ / तक्रारी व अनुचित कामगार प्रथे अंतर्गत दाखल केलेल्या न्यायप्रविष्ट प्रकरणांचा तपशिल व अंतरिम आदेश असल्यास त्याचा तपशिल | |
| ४५ | कापड गिरण्याबाबत गठीत केलेल्या मॉनेटरींग कमिटी, हाय पॉवर कमिटी, को-ऑर्डीनेशन कमिटीसमोर बंद गिरणीचे प्रकरण सुरु आहे काय किंवा कसे ? व त्याचा तपशिल | |
| ४६ | **आस्थापनेतील/कारखान्यातील सर्व कामगारांना/ कर्मचा-यांना देण्यात आलेल्या कायदेशिर देणी पोटीच्या रक्कमेचा तपशिल तसेच कायम कामगार/कर्मचारी व कंत्राटी,तात्पुरते, प्रशिक्षणार्थी कामगार यांच्या संख्ये बाबत देणारा तपशिल तसेच** | |

| | | |
|---|---|---|
| | **भविष्यात कामगारांनी/कर्मचा-यांनी शासकिय प्राधिका-यांकडे/न्यायाधिकरणाकडे विवाद उपस्थित केल्यास त्याचे दायीत्व स्विकारणारे हमीपत्र/शपथपत्र ३०० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर (नोटराईजड) अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे. ते केले आहे किंवा कसे ?** | |
| ४७ | **कायम कामगार/कर्मचारी,तात्पुरते,कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची वा त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशिर देणी बाबत/विवादा बाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापन/विकासका विरुध्द् असल्यास त्याबाबतचे दावे/तक्रारी नजीकच्या अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त,/सहाय्यक कामगार आयुक्त,/ सरकारी कामगार अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पुराव्यासहीत वर्तमानपत्रात जाहीर नौटीस प्रसिध्द् झाल्यापासून १५ दिवसांत सादर करावेत अशा प्रकारची जाहीर नोटीस किमान दोन स्थाानिक वर्तमानपत्रातून स्थानिक भाषेत प्रसिध्द् करणे आवश्यक आहे. अशी जाहीर नोटीस प्रसिध्द् केल्याबाबत संबंधित वर्तमानपत्राच्या कात्रणाच्या प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच जाहीर नोटीसीच्या अनुषंगाने प्राप्त झालेले दावे/तक्रारी इत्यादी बाबतचा व त्यानुसार केलेल्या पुर्ततेचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे. सबब, त्यानुसार कारवाई केली किंवा कसे ? याचा तपशिल कृपया सादर करावा.** | |

आपला विश्वासु,

अर्जदारांचे नांव,हूदद्दा व स्वाक्षरी .

दिनांक :-

**व्यवस्थापनाने / मालकाने कामगारांची देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी अर्जासोबत सादर करावयाची स्वतंत्र यादीचा (चेक लिस्ट) तपशिल.**

| अनु. क्र. | माहितीचा तपशिल |
|---|---|
| १. | गिरणी/कारखाना/आस्थापना यांचे नांव व पुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक यांचा तपशिल असणारा अर्ज (Forwarding Letter) |
| २. | कामगारांची कायदेशीर देणी प्रलंबित नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याबाबतचा विहित नमुन्यातील अर्ज. |
| ३. | **महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ/स्थानिक स्वराज्य संस्था/महसुल विभाग यांच्याकडून जागा/भुखंड विक्रीने अथवा भाडेतत्वांवर घेतल्याबाबतचे कब्जा पावती/मालमत्ता पत्रक तसेच उभयपक्षांत झालेल्या जागेच्या भाडेकरार/विक्री संबंधी भाडेकराराच्या संबंधीच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती. (Certified Copy)** |
| ४. | आस्थापनेच्या/कंपनीच्या मुळ मालकाने/भागीदाराने/संचालकाने जागा विकण्याबाबत /जागेचा विकास करण्याबाबत करार/ठराव केल्यास त्याबाबतच्या कराराची/ठरावाची छायांकित व साक्षांकित प्रत. तसेच कंपनी/आस्थापना ही पब्लीक लिमिटेड/लिमिटेड/प्रायव्हेट लिमिटेड असल्यास जागा विकणे बाबत/विकास करण्याबाबतचा संचालक मंडळाचा ठराव केल्यास ठरावाची छायांकित व साक्षांकित प्रत. |
| ५. | अर्जदारास जागेच्या मालकाने/भागीदारांनी तसेच संचालक मंडळाने प्रस्तुतचा अर्ज करण्याबाबत प्राधिकृत केल्यास त्याबाबतच्या ठरावाचे/संचालक मंडळाच्या ठरावाची छायांकित व साक्षांकित प्रत. |
| ६. | जमीनीचे हस्तांतरण करावयाचे आहे की, विकास करावयाचा आहे याबाबतची स्पष्ट माहिती देणा-या अर्जाची प्रत. |
| ७. | विषयांकित जागेची विक्री/हस्तांतरण/खरेदी करण्याबाबत संबंधित पक्षकाराने केलेल्या व्यवहाराची नोंदणी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या कागदपत्रांच्या छायांकित व साक्षांकित प्रती . |
| ८. | कारखाना बंद झाल्याची तारीख- कामगार आयुक्तांच्या परवानगीची प्रत. |
| ९. | कारखाना बंद झाल्याची कारणे नमुद करणा-या तपशिलाची स्वतंत्र प्रत. |
| १०. | कारखाना बंद होतांना कार्यरत असणा-या कामगार/कर्मचा-यांची संख्या<br>**१. कायम कामगार**<br>**२. कार्यालयीन कर्मचारी**<br>**३. तात्पुरते कामगार**<br>**४. कंत्राटी कामगार**<br>**५. प्रशिक्षणार्थी कामगार**<br>**कामगारांचे हजेरी पुस्तक** |
| ११. | आस्थापना बंद पडण्या पुर्वीच्या मागील १२ महिन्यात हजेरीपटावर असलेल्या |

| | |
|---|---|
| | कामगार/कर्मचा-यांची सरासरी संख्या- **कामगारांचे हजेरी पुस्तक** |
| १२. | कामगार संघटनेचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक - संघटनेचे पत्र |
| १३. | कामगार संघटना, मान्यता प्राप्त संघटना/प्रातिनिधीक संघटना आहे काय- संघटनेचे पत्र तसेच मान्यतेबाबतचे पत्र. |
| १४. | औद्योगीक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २५ (ओ) नुसार शासनसाची पुर्व परवानगीबाबत कामगार आयुक्तांनी बंद करण्यास परवानगी दिलेल्या आदेशाची प्रत किंवा बंद करण्यापूर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या सूचनेची प्रत. |
| १५. | उद्योग बंद करण्या पुर्वी औद्योगीक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २५ एफ एफ नुसार ६० दिवसांची पुर्व सुचना शासनास दिल्यास, सुचनेची प्रत. |
| १६. | कारखाना बंद झालेल्या परिणामीत होणा-या कामगारांच्या संदर्भात कामगार संघटनेशी करार करण्यात आलेल्या कराराची प्रत. |
| १७. | स्वेच्छानिवृत्ती स्विकारलेल्या सर्व कामगारांची स्वेच्छानिवृत्तीची पत्रे. |
| १८. | कंपनीचे भौगोलीक स्थलांतर झालेले असल्यास कंपनी जेथे स्थलांतरीत झाली त्या जागेचा पत्ता याबाबतची माहिती दर्शविणा-या पत्राची प्रत. |
| १९. | कंपनीच्या स्थलांतराच्या संदर्भात कंपनी स्थलांतरीत होतांना कामावर असलेल्या कामगारांचे मस्टर रोल व स्थलांतरीत जागी असलेल्या कामगारांचे मस्टर रोल यांच्या छायाकिंत प्रती. |
| २०. | जुन्या जागेतील सर्व कामगारांना नवीन स्थलांतरीत जागी नोकरीच्या सलगतेसह व सेवाशर्तीत प्रतिकुल बदल न करता स्थलांतरीत करण्यात आल्याबाबत कामगारांची समंती पत्रे. |
| २१. | व्यवस्थापनात बदल झालेला असल्यास व्यवस्थापनातील बदलामुळे कामगारांच्या सेवेतील अखंडता आणि सेवाशर्ती कायम ठेवण्यात आल्या आहेत याबाबत तपशिलवार माहिती देणा-या पत्राची प्रत व कामगारांची समंती पत्रे. |
| २२. | कंपनीचे स्थलांतर/व्यवस्थापनातील बदल/स्वेच्छानिवृत्ती या बाबत कामगार संघटनेशी झालेल्या कराराची प्रत. |
| २३. | जमीनीच्या विक्री/खरेदी/विकास/स्थलांतर व्यवस्थापनातील बदल यांमुळे किती कामगार परिणामीत झाले आहेत तसेच किती कामगारांच्या नोक-या संपुष्टात आल्याआहेत त्याची संख्या व त्याबाबतची माहिती दर्शविणारे पत्र. |
| २४ | किती कामगारांना कायदेशिर रक्कम/स्वेच्छानिवृत्तीची रक्कम वाटप करण्यात आलेल्या रक्कमेच्या पावत्या व एकुण रक्कम किती याबाबतीत स्वतंत्र तपशिलवार पत्र. |
| २५. | नोकरी गमावलेल्या किती कामगारांची किती आर्थिक रक्कम वाटप करण्याचे शिल्लक राहीलेले आहे याबाबतची माहिती दर्शविणारे पत्र. |
| २६. | कामगारांना देय असलेल्या रक्कमे बाबत मुळ मालकाशी काही करार झाला आहे काय व असल्यास त्या कराराच्या अटी (कराराची प्रत) |
| २७ | विकासकाने/खरेदीदाराने जी जमीन विकसीत करावयाची आहे ती जमीन कोर्ट |

| | |
|---|---|
| | रिसीव्हर/लिक्वीडेटरकडून जाहीर लिलावात घेतलेली असल्यास त्याबाबतच्या ओदशाची प्रत. |
| २८. | बी.आय.एफ.आर.कडे संदर्भ केला असल्यास त्याची प्रत. |
| २९. | आस्थापना आजारी घोषित केली असल्यास आदेशाची प्रत. |
| ३०. | ऑपरेटींग एजन्सी नियुक्त केली असल्यास आदेशाची प्रत. |
| ३१. | पुनरुज्जीवन योजना मंजूर झाली असल्यास कामगारांची देणी देण्याबाबत योजनेतील तरतूदी व कामगारांना दिलेली देय रक्कम व कामगारांची संख्या याबाबतच्या आदेशाची प्रत. |
| ३२. | बी.आय.एफ.आर.आदेशानुसार कारभार गुंडाळण्याचे आदेश दिले असल्याचा त्याचा दिनांक व उच्च न्यायालया समोरील या बाबत सद्य:स्थिती ए.आय.एफ.आर.कडे अपिल दाखल केले असल्यास त्याची प्रत. |
| ३३. | लिक्वीडेटर/कोर्ट रिसीव्हर यांनी मालमत्ता ताब्यात घेतल्यास कोर्ट रिसीव्हर/लिक्वीडेटर यांनी मालमत्तेचा लिलाव केल्यास, कामगारांनी त्यांच्या देण्यापोटी वसूल करावयाच्या रक्कमेचा दावा कोर्ट रिसीव्हर/लिक्वीडेटरकडे दाखल केला असल्यास दाव्यातील एकुण रक्कम दर्शविणारे स्वतंत्र तपशिलवार पत्र. |
| ३४ | कामगार/कामगार संघटना यांनी कारखाना बंद केल्या विरुध्द् औद्योगीक न्यायालय/उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालयासमोर कामगारांची देणी मिळणे/कामकाज पुर्ववत सुरु करणे या बाबत न्यायप्रविष्ट प्रकरणांचा तपशिल व अंतरिम आदेशांच्या प्रती. |
| ३५. | कापड गिरण्याबाबत गठीत केलेल्या मॉनेटरींग कमिटी, हाय पॉवर कमिटी, को-ऑर्डीनेशन कमिटीसमोर बंद गिरणीचे प्रकरण सुरु असल्याबाबतच्या आदेशाची प्रत. |
| ३६. | **आस्थापनेतील/कारखान्यातील सर्व कामगारांना/कर्मचा-यांना देण्यात आलेल्या कायदेशिर देणी पोटीच्या रक्कमेचा तपशिल तसेच कायम कामगार/कर्मचारी व कंत्राटी,तात्पुरते, प्रशिक्षणार्थी कामगार यांच्या संख्ये बाबत देणारा तपशिल तसेच भविष्यात कामगारांनी/कर्मचा-यांनी शासकिय प्राधिका-यांकडे/न्यायाधिकरणाकडे विवाद उपस्थित केल्यास त्याचे दायीत्व स्विकारणारे ३०० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर (नोटराईजड) हमीपत्र/शपथपत्र .** |
| ३७ | **कायम कामगार/कर्मचारी,तात्पुरते,कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची वा त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशिर देणी बाबत/विवादा बाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापन/विकासका विरुध्द् असल्यास त्याबाबतचे दावे/तक्रारी नजीकच्या अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त,/सहाय्यक कामगार आयुक्त,/ सरकारी कामगार अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पुराव्यासहीत वर्तमानपत्रात जाहीर नौटीस प्रसिध्द् झाल्यापासून १५ दिवसांत सादर करावेत अशा प्रकारची जाहीर नोटीस किमान दोन स्थानिक वर्तमानपत्रातून स्थानिक भाषेत प्रसिध्द् केलेल्या जाहीर नोटीसीच्या संबंधित वर्तमानपत्राच्या कात्रणाच्या प्रती.** |